महिला व बालकांचे सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्याकरीता एक प्रशिक्षण व कार्यरत न्यायसहाय्यक प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षामध्ये निधी वितरित करण्यास व खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण ०११८/ प्र.क्र.८३/ विशा - ६
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २५/०२/२०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक- संकीर्ण-०११८/प्र.क्र.८३/विशा-६, दिनांक ०१.०१.२०१९
२) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली कार्यालयाचे पत्र क्र. २०५१७/ ०७/ २०१७/CIS-II, दिनांक २७.११.२०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भीय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महिला व बालकांचे सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्याकरीता एक प्रशिक्षण व कार्यरत न्यायसहाय्यक प्रयोगशाळा स्थापन करण्यास प्रशासकीय मंजूरी प्रदान केली आहे. व त्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये रू. रु. ४५८.४० लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लक्ष चाळीस हजार फक्त) इतका निधी प्राप्त झालेला आहे. यानुषंगाने २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी एकूण रु. ४५८.४० लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लक्ष चाळीस हजार फक्त) इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर निधी वितरीत व खर्च करण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महिला व बालकांचे सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करणे (CCPWC) या योजनेअंतर्गत " सायबर गुन्हे फॅारेन्सिक लॅब व प्रशिक्षण केंद्र " (१००% केंद्र पुरस्कृत) योजना राज्यात सुरू करण्यासाठी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी एकूण रु. ४५८.४० लक्ष (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लक्ष चाळीस हजार फक्त) इतकी रक्कम संदर्भीय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या प्रयोजनासाठी वितरीत व खर्च करणे यांकरीता, याद्वारे, मंजूरी देण्यात येत आहे.

२. उक्त खर्च हा, गृह विभाग, मागणी क्रमांक बी-१०, २०५५ - पोलीस (००), ११५- पोलीस दलाचे आधुनिकीकरण (०१) (०२) महिला व बालकांवरील सायबर क्राईम प्रतिबंधक योजना (२०५५A१२१), १३- कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली चालू (सन २०१८- १९) वित्तीय वर्षात खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर प्रयोजनासाठी या लेखाशीर्षांतर्गत प्राप्त होणारा निधी खर्च करण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर यांना नियंत्रण अधिकारी व कार्यालयीन अधिक्षक, सायबर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. महिला व बालकांचे सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करणे (CCPWC) या योजनेअंतर्गत " सायबर गुन्हे फॉरेन्सिक लॅब व प्रशिक्षण केंद्र " (१००% केंद्र पुरस्कृत) योजना राज्यात सुरू करण्यासाठी केंद्र शासन, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

५. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक ०२.०४.२०१८ अन्वये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाच्या अनुषंगाने निधी वितरणाबाबत दिलेल्या सूचनांचे पालन करावे

६. केंद्र शासन, गृह विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला निधीचा विनियोग / खर्च केद्र / राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार विहीत पध्दतीने येणा-या किंमतीनुसार व शिर्षनिहाय विहीत करण्यात आलेल्या एकूण वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून व यासंदर्भातील वित्तीय औपचारीकता पूर्ण करून करण्यात यावी.

७. कोणत्याही परिस्थितीत प्राप्त निधी संचित (parking) स्वरूपात ठेऊ नये. यानुषंगाने प्राप्त निधीचा विनियोग झाल्यानंतर विहीत कालावधीत योग्य त्या विवरणपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र (utilization certificate) सादर करावे. प्रस्तुत योजनेचे प्राधिकारी म्हणून केंद्रशासनाच्या आवश्यकतेनुसार अंतर्गत लेखापरीक्षणासाठी यासंदर्भातील लेखे अद्यावत ठेवण्यात यावे.

८. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२६६ /१४६१ , दिनांक ०७.०१.२०१९ व
वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ५०/ अर्थोपाय, दिनांक ०२.०२.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०२२५१५५९३६९६२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kathawate Ganesh Mohan

Digitally signed by Kathawate Ganesh Mohan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ddf28fd1f8f29ff8697fe818d6972a7b4a8f1571332ccbea3052a34fcfc7f539, serialNumber=9f40ba5d0001001e5d7fb08f1f09fa7254742312881f9048102f68cd0ed7649f, cn=Kathawate Ganesh Mohan
Date: 2019.02.25 16:01:27 +05'30'

(गणेश काथवटे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. गृह राज्यमंत्री (शहरे/ ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर

७) कार्यालयीन अधिक्षक, सायबर
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१२) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१३) अवर सचिव (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड फाईल, विशा-६.